देशोन्नती
नांदेड | शुक्रवार | दि.६ जून २०२५ www.de



**नांदेड ग्रामीण व मुदखेड ठाण्यातंर्गत कारवाई**

# कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या गोवंशाची स्थागुशाने केली सुटका

**१५ जनावरे मुक्त; ९ लाखाचा मुद्देमाल जप्त**

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ५ जून रोजी नांदेड ग्रामीण व मुदखेड पोलिस ठाण्याअंतर्गत कत्तलीसाठी गोवंश घेऊन जाणारे वाहन ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १५ जनावरे व वाहन असा एकूण ९ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मिलींद सोनकांबळे, पोउपनि महेश कोरे यांनी ५ जून रोजी नांदेड ग्रामीण हद्दीतील मिल्लतनगर येथुन एका बोलेरो पिकअप वाहनातून कांही ईसम गोवंश जातीचे जनावरे कत्तलीसाठी घेवुन जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पथकाने सापळा रचून महिंद्रा बोलेरो पिकअप क्रमांक एम.एच. २६ बी.ई. ३३९८ यास थांबण्याचा इशारा केला असता वाहन चालकाने वाहन न थांबवता भरधाव वेगात नेवुन पळून जावुन सदरचे वाहन मिल्लतनगर रोडवर सोडुन त्यातील चालक व त्याचेसोवत असलेले दोन ईसम पळुन गेले. यावेळी पोलिसांनी त्यातील ७ लाख ७० हजार रुपये किमतीचे ८ गोवंशीय जातीचे जनावरे जप्त करून पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे ताब्यात दिले.

या कारवाई पथकात पोउपनि मिलिंद सोनकांबळे, महेश कोरे यांच्यासह माधव केंद्रे, रवी बामणे, टोणगे, मलदोडे, लोसरवार, यादगिरवाड, चंद्रकांत स्वामी यांचा समावेश होता.

## मुदखेड हद्दीतुन ७ जनावरांची सुटका

पोउपनि महेश कोरे व त्यांच्या पथकातील अंमलदारानी मुदखेड हद्दीतील मुदखेड कुरेशी मोहल्ला येथील एका पत्राचे शेडमध्ये गोवंशीय जातीचे जनावरे कत्तल करण्यासाठी डांबुन ठेवलेले ७ गोवंशीय जातीचे जनावरे ताब्यात घेऊन मुदखेड पोलिसांच्या स्वाधीन केले. सदर दोन्ही कार्यवाहीमध्ये एकूण ९ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.